दै. गोदातीर

(30)

# फोटोसह तपशील न देणाऱ्या मतदारांची नावे वगळणार

**नांदेड-** मतदार यादी पुर्ननिरिक्षण कार्यक्रमात मतदार नोंदणी केलेल्या मतदारांनी फोटोसह तपशील देणे आवश्यक असून दि.४ डिसेंबरपुर्वी २०१६ तपशिल न देणाऱ्यांची नावे मतदार यादीतून वगळण्यात येणार आहेत.

महापालिकेमार्फत दि.१६ सप्टेंबर २०१६ ते २१ ऑक्टोबर २०१६ या कालावधीत मतदार नोंदणी अभियान राबविण्यात आले. विधानसभा मतदार संघाच्या यादीत मयत, दुबार, स्थलांतरीत तसेच फोटो नसलेल्या मतदारांचे प्रमाण अतिशय जास्त आहे. सदयस्थितीत फोटो नसलेल्या मतदारांची यादीची प्रसिध्दी/वाचन करण्यात आली आहे. मतदारांसाठी क्षेत्रीय अधिकारी कार्यालयाअंतर्गत प्रभागनिहाय वसुली लिपिक किंवा सुपरवायझर यांच्याकडे यादी पाहण्यासाठी उपलब्ध आहे. संबंधित मतदारांन आपले फोटो तसेच तपशिल मतदार नोंदणी अधिकार तथा उपविभागीय अधिकारी, नांदेड यांचेकडे दि. डिसेंबरपूर्वी दाखल करावेत. विहित कालावधीत फोट तसेच तपशील सादर न करणाऱ्या मतदारांनी ना या यादीतून वगळण्याची कार्यवाही होणार असल्या मतदार नोंदणी अधिकारी यांनी कळविले आहे.